N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** पिंपरी-चिंचवड **P.S.(ठाणे):** हिंजवडी
   **FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0326 **Year (वर्ष):** 2026
   **Date and Time of FIR (प्र. ख. दिंनाक आणि वेळ):** 20/05/2026 03:48

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
   1. **Day(दिवस):** मंगलवार **Date From (दिंनाक पासून):** 19/05/2026
      **Time Period (कालावधी):** पहर 6 **Date To ( दिंनाक पर्यत):** 19/05/2026
      **Time From (वेळेपासून):** 18:06 बजे
      **Time To (वेळेपर्यत):** 18:06 बजे

   (b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
   **Date (दिंनाक ):** 20/05/2026 **Time (वेळ):** 03:00 बजे

   (c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
   **Entry No. (नोंद क्र.):** 012
   **Date & Time (दिंनाक आणि वेळ):** 20/05/2026 03:00 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
   1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
   उत्तर, 4 किमी **Beat No. (बिट क्र.):**
   (b) **Address (पत्ता):** सजा माण तामुळशी जिपुणे

   (c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
   **Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
   **District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with CamScanner

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) Name (नाव): श्री.प्रविण निंबाळकर पोलीस निरीक्षक

(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :

(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष): 1986

(d) Nationality (राष्ट्रीयत्व): भारत

(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):

(f) Passport No.(पारपत्र क्र.):

Date of Issue (दिल्याची तारीख):

Place of Issue (दिल्याचे ठिकाण):

(g) ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) Address (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाप्रवि पुणे,पिंपरी-चिंचवड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाप्रवि पुणे,पिंपरी-चिंचवड,महाराष्ट्र,भारत |

(i) Occupation (व्यवसाय):

(j) Phone number (फोन नं.):

Mobile (मोबाइल नं.): 91-9552574140

7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री.संतोष प्रल्हाद राणे | | | 1. फलट नंबी/705, गंगा ओशीयन ,पार्क, राजस सोसायटी जवळ कात्रज,कोंढवा रोड, पुणे,पिंपरी-चिंचवड,महाराष्ट्र,भारत |

8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विंलबाची कारणे):

9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|



Scanned with CamScanner

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये)):

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

मी प्रविण नारायण निंबाळकर,वय-39 वर्षे व्यवसाय नोकरी,पद-पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे मो.नं.9552574140.

मी वरील प्रमाणे असुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे येथे पोलीस निरीक्षक म्हणुन कार्यरत आहे. दि. 11/05/2026 रोजी मी लाचलुचपत प्रतिबधक विभाग ,पुणे येथे हजर असताना प्रशासन अधिकारी श्री.सतिश वाळके, पोलीस उपअधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी तक्रारदार श्री. अतुल दत्तात्रय राक्षे यांचकडे लाच मागणी होत असलेबाबतची तक्रार असून त्याप्रमाणे पुढील कायदेशीर कारवाई करा असे सांगुन त्यासाठी पथक तसेच गोपनिय कारवाई कामी राखीव असलेले 1) देवीदास शिवाजी सुदामे कनिष्ठ लिपीक ,कृषी विभाग विभागिय कृषी सहसंचालक विभाग, पुणे 2) अशोक गोरख जपे कनिष्ठ लिपीक ,कृषी विभाग विभागिय कृषी सहसंचालक विभाग,पुणे हे पंच उपलब्ध करुन दिले. सदर पंचासमक्ष तक्रारदार यांनी तक्रार प्रथम तोंडी कथन करुन लेखी तक्रार दिली ती थोडक्यात पुढीलप्रमाणे,

तक्रारदार श्री. अतुल दत्तात्रय राक्षे यांच्या वडीलोपार्जीत शेत जमीनीचा 7/12 उतारा व फेर- फार वर तक्रारदार व त्यांचे भावाचे नावे नोंद होण्याकरीता सजा माण ता.मुळशी जि.पुणे चे तलाठी श्री.राणे यांचेकडे अर्ज दिला होता. त्या अनुषंगाने फेरफार वर नाव धरणेसाठी तक्रारदार यांचेकडे तलाठी राणे यांनी दिड लाख रुपये ची मागणी केली व तडजोडीअंती 1 लाख पंचवीस हजार रुपये ची मागणी करुन पैसे दिल्या शिवाय फेरफार नोंद धरणार नाही असे सांगितले.मागणी केलेल्या 1 लाख 25 हजार रुपयापैकी 1 लाख रुपये तात्काळ मागणी करुन उरलेले 25 हजार रुपये फेरफार नोंद धरलेनंतर दयावे लागतील असे तलाठी राणे यांनी सांगुन तक्रारदार यांचेकडुन 1 लाख रुपये स्विकारले असुन दि.07/05/2026 रोजी तलाठी राणे यांनी तक्रारदार यांना फेरफार नोंद धरल्याचे सांगुन राहीलेले 25,000/- रुपयेची मागणी केली अशा आशयाची तक्रार दि.11/05/2026 रोजी दिली होती त्या तक्रारीवर आम्ही व पंच साक्षीदार यांनी वाचून त्यावर सहया केल्या.

त्यानंतर तक्रारदार श्री.राक्षे यांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दि.12/05/2026 रोजी पुढील पडताळणी कारवाई करणेचे ठरले. तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने तक्रारदार श्री.राक्षे यांचेकडे तलाठी राणे सजा माण ता.मुळशी जि.पुणे हे लाच मागणी करतात अगर कसे या पडताळणी करीता सोनी कंपनीच्या काळया रंगाच्या शासकिय व्हॉईस रेकॉडर मध्ये सॅनडिस्क कंपनीचे 32 जीबी क्षमतेचे सिलबद पॅकिंगमधील मेमरीकार्ड काढले त्याची आम्ही पंचाचे समक्ष पाहणी केली असता त्याचे एका बाजुस. Sandisk 32GB Micro SD HC I C4 52010NAZN13Q BH MADE IN TAIWAN व त्याचे दुस-या बाजुस MCP-XY1/26 HF CE MMC08A215F-TO DLD XAH 2601 MADE IN TAIWAN अशा वर्णनाचे असुन ते व्हॉईस रेकॉर्डर मध्ये टाकुन तक्रारदार श्री.अतुल राक्षे यांचे निवेदन घेऊन त्यापाठोपाठ पंच क्र. 1 व 2 यांचे निवेदन घेतली ती वेळ 15.45 वा.ची होती.सदर निवेदन घेतेवेळी 8 जीबी क्षमतेचे सिलबद पॅकिंगमधील मेमरीकार्ड त्याची आम्हा पंचाचे समक्ष पाहणी केली असता त्याचे एका बाजुस JKMMC Micro SD HC C10 8 GB व दुस-या बाजुस JM07/20 CE MMB08B215FT4-LJC XYAX 20Y07 MADE IN TAIWAN असे वर्णनाचे मेमेरी कार्ड मोबाईल मध्ये टाकुन पंचासमक्ष व्हिडीओ चित्रीकरण करण्यात आले आहे. त्यानंतर पडताळणी कारवाईच्या अनुषंगाने तक्रारदार दोन्ही पंच व सापळा पथकास योग्य त्या सुचना देऊन व्हाईस रेकॉर्डर चालू करून तो तक्रारदार श्री.राक्षे यांना लावुन दिला व पंच क्र.01 श्री.सुदामे यांचेसह पडताळणीकामी तक्रारदार यांचे कार्यालय राक्षे वस्ती , माण ता.मुळशी जि.पुणे येथुन सजा माण ता.मुळशी जि.पुणे येथे रवाना केले ती वेळ 16.00 वा ची होती.

त्यानंतर थोडया वेळाने तक्रारदार व पंच हे सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत आले त्यावेळी आम्ही तक्रारदार यांचेकडील व्हॉईस रेकॉर्डर काढुन बंद केला ती वेळ 16.19 वा ची होती. त्यावेळी तक्रारदार यांना गेल्यापासुन येईपर्यंत काय झाले असे विचारले असता त्यांनी सांगितले की"ते व पंच क्र.1 श्री.सुदामे असे सजा माण,



Scanned with CamScanner

ता.मुळशी जि.पुणे येथे गेलो तिथे त्यावेळी तक्रारदार व तलाठी राणे यांचेमध्ये तक्रारदार यांचे कामासंबंधी चर्चा झाली त्यावेळी तलाठी राणे यांनी तक्रारदार यांना उदया या असे सांगितले. त्यानंतर पुढील कारवाई तक्रारदार संपर्क करतील त्यावेळी करण्याचे ठरले.सदर बाबत सविस्तर पंचनामा करणेत आला आहे.

त्यानंतर दि.14/05/2026 रोजी तक्रारदार यांनी पुढील कारवाईसाठी संपर्क केलेने कारवाईसाठी पंच व सापळा पथक तक्रारदार यांचे कार्यालय राक्षे वस्ती माण ता.मुळशी जि.पुणे येथे पोहोचले व तक्रारदार यांना शासकिय रेकॉर्डर चालु करुन लाऊन देऊन पंच 1 सुदामे यांचेसह तलाठी राणे यांचे कार्यालय सजा माण ता.मुळशी जि.पुणे यांचेकडे पाठवण्याचे ठरले त्या अनुषंगाने श्री.अतुल राक्षे यांचे निवेदन घेऊन त्यापाठोपाठ पंच क्र.1 व 2 यांचे निवेदन घेतली ती वेळ 16.49 वा.ची होती सदर वेळी व्हिडीओ रेकार्डींग करण्यात आलेले आहे. त्यानंतर मी पडताळणी कारवाईच्या अनुषंगाने तक्रारदार दोन्ही पंच व सापळा पथकास योग्य त्या सुचना देऊन व्हाईस रेकॉर्डर चालू करून तो तक्रारदार श्री.राक्षे यांना लावुन दिला व पंच क्र.01 श्री.सुदामे यांचेसह पडताळणीकामी तक्रारदार यांचे कार्यालय राक्षे वस्ती ,माण ता.मुळशी जि.पुणे येथुन तलाठी राणे यांचे कार्यालय सजा माण ता.मुळशी जि.पुणे येथे रवाना केले ती वेळ 17.01 वा ची होती.

त्यानंतर थोडया वेळाने तक्रारदार व पंच हे सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत आले त्यावेळी आम्ही तक्रारदार यांचेकडील व्हॉईस रेकॉर्डर काढुन बंद केला ती वेळ 17.32 वा ची होती. त्यावेळी मी तक्रारदार यांना गेल्यापासुन येईपर्यंत काय झाले असे विचारले असता त्यांनी सांगितले की, "मी व पंच क्र.1 श्री.सुदामे असे सजा माण,ता.मुळशी जि.पुणे येथे गेलो त्यावेळी तलाठी राणे यांनी पंचांना उद्देशुन हयाच काय नाव?, असे विचारुन पंचांना बाहेर थांबणेस सांगितले असता पंच कार्यालयाचे बाहेर थांबले.सदर वेळी आमचेमध्ये माझे फेरफार चे कामासंदर्भात चर्चा झाली त्यावेळी तलाठी राणे यांनी मला "किती आणलेत?" असे विचारून माझेकडे पैशाची मागणी केली.त्यावेळी "मी आता नाय काय आणल." असे म्हणुन "किती आणु?" असे तलाठी राणे यांना विचारले त्यावेळी तलाठी राणे मला , "देव तुम्हाला बुध्दी देईल तेवढे आणा." ये तु घेऊन." असे म्हणुन."तुमच्या मनानी काय जा लवकर या माघारी" असे म्हणाले.त्यावर मी तलाठी राणे यांना "नाय तुम्ही सांगा" असे म्हणालो असता ते मला "डायरेक्ट करा." असे म्हणून मोबाइल वर 25 हजार टाईप केले.त्यावेळी मी "मग आपल ज्या वेळेस लास्ट टाईम अं दिड लाख रुपये म्हणले होते". असे म्हणालो त्यावर ते "हंम" असे म्हणाले त्यावर "त्यामध्ये मी साधारण तुम्हाला दिले डिल आपली सव्वावर ठरली होती सव्वा लाख रुपये", एक लाख रुपये तुम्हाला पोच झाले" असे मी म्हणालो त्यावेळी त्यांनी "हंम" असे म्हणुन होकार दिला.त्यावर "25 हजार रुपये मी तुम्हाला देणय ते एक तासाभरात आणुन देतो."असे विचारले असता त्यांनी होकार दिला व माझे कामाचे अनुषगाने चर्चा केली.त्यानंतर ते, "आता मी नाराजय" असे, म्हणाले असता मी त्यांना "पंचवीस हजार रुपय देऊ का?" असे विचारले त्यावर तलाठी राणे मला "जे असल ते टाईप करुन बोलायच अन निघुन जायच." असे म्हणाले.त्यावर मी "तेवढ देतो आणुन"असे म्हणालो त्यावर तुमच्या हयानी बघा,असे म्हणुन त्यानंतर "गांजा बीजा ओडायला बसलो काय हित मी..जा घेऊन ये" असे म्हणुन तलाठी राणे यांनी त्यांच्या मोबाईल मध्ये 25 हजार आकडा टाईप करुन 25 हजार रुपयेची मागणी केली.त्यावर मी "नक्की फिक्स ना" असे विचारले असता त्यांनी "हं" असे म्हणुन मला पैसे घेऊन येणेस सांगितले. त्यानंतर मी आपण थांबलेल्या ठिकाणी परत आलो. सदर वेळी त्यांनी माझेकडे 25 हजार रुपये लाच मागणी केली. अशी हकिकत सांगितली.त्यानंतर पंच क्र.01 सुदामे यांना गेले पासुन येई पर्यंत काय झाले याबाबत विचारणा करता पंच क्र.01 सुदामे यांनीही तक्रारदार यांचे प्रमाणे हकिकत सांगितली.त्यानंतर मी पंचासमक्ष व्हॉईस रेकॉर्डरमधील मधील ध्वनिमुद्रीत संभाषण फास्ट फॉरवर्ड करून ऐकले असता ते तक्रारदार व पंच क्र.1 यांनी सांगितलेली हकिकतप्रमाणे खरे असलेबाबतची खात्री केली असता सदर पडताळणी वेळी तक्रारदार व त्यांचे भाऊ यांचे वडीलोपाजीत शेत जमीनीचा 7/12 उतारा व फेरफार वर नाव धरणेसाठी तक्रारदार यांचेकडे तलाठी राणे यांनी यापुर्वी दिड लाख रुपये ची मागणी करुन तडजोडीअंती 1 लाख पंचवीस हजार रुपये ची मागणी करुन यापुर्वीच 1 लाख रुपये स्विकारल्याचे मान्य करुन फेरफार नोंद धरल्याचे सांगुन उर्वरीत 25,000/- रुपयेची मागणी केलेचे निष्पन्न झालेने तक्रारदार यांना लाच रक्कम हजर करणेस सांगितले असता तक्रारदार यांनी सांगितले की, आता कार्यालय बंद झाले असुन ज्यावेळी तलाठी राणे हे कार्यालयात उपलब्ध असतील त्यावेळी मी आपणास संपर्क करेल त्यावेळी पुढील कारवाई करु असे सांगितलेने दि.14/05/2026 रोजीची कारवाई स्थगित करण्यात आली सदर बाबत सविस्तर पंचनामा करणेत आला आहे.

दि.19/05/2026 रोजी तक्रारदार यांनी पुढील कारवाई कामी संपर्क केलेने आम्ही पंच व सापळा पथक तक्रारदार यांचे कार्यालय येथे आलो .सदर वेळी तक्रारदार यांनी पंचासमक्ष तलाठी राणे यांनी मागणी केलेली लाच रक्कम त्यांना देणेसाठी घेऊन जातो असे सांगितलेने सापळापुर्व व सापळा पंचनामा कारवाई सुरू करण्यात आली. त्यानंतर आम्ही दोन्ही पंचांसमक्ष तक्रारदार अतुल राक्षे यांना लाच रक्कम हजर करणेस सांगितले असता तक्रारदार



Scanned with CamScanner

यांनी त्यांचेकडील 25,000/- रुपये हजर केलेने सदर नोटांचे नंबर कागदावर लिहुन काढले त्यावर आम्ही व पंचांनी सहया केल्या. त्यानंतर अॅन्थ्रासीन पावडरचे गुणधर्म समजावुन सांगुन प्रात्यक्षिक दाखवुन सदर नोटांना एॅन्थ्रासीन पावडर लाऊन नोटा तक्रारदार यांचे नेसत्या पँटच्या पुढील बाजुच्या उजव्या खिशामध्ये ठेवली. सापळा कारवाई करीता सोनी कंपनीच्या काळया रंगाच्या शासकिय व्हॉईस रेकॉडर मध्ये यापुर्वी कारवाई करीता वापरलेले व सिलबद करुन ठेवलेले Sandisk 32GB Micro SD HC I C4 52010NAZN13Q BH MADE IN TAIWAN व त्याचे दुस-या बाजुस MCP-XY1/26 HF CE MMC08A215F-TO DLD XAH 2601 MADE IN TAIWAN अशा वर्णनाचे मेमरी कार्ड टाकले त्यामध्ये सापळा कारवाईचे अनुषंगाने प्रथम तक्रारदार राक्षे त्यानंतर दोन्ही पंचांचे निवेदन घेतले ती वेळ 17.34 वा ची होती.सदर वेळी व्हिडीओ चित्रीकरण करण्यात आले आहे. त्यावेळी मी तक्रारदार पंच व सापळा पथक यांना योग्य त्या सुचना देऊन तक्रारदार यांना व्हॉईस रेकॉर्ड चालु करुन लाऊन देऊन पंच क्र.1 सुदामे यांचेसह तक्रारदार यांचे चारचाकी मधुन सापळा कारवईकामी रवाना केले ती वेळ 17.54 वा ची होती.त्यांचे पाठोपाठ सापळा पथक व पंच क्र.02 असे रवाना झालो व माण तलाठी कार्यालयाच्या काही अंतरावर शासकिय वाहन कोणास संशय येणार नाही अशा प्रकारे थांबून राहीलो. थोडया वेळाने तक्रारदार यांनी लाच रक्कम स्विकारलेबाबत पुर्व नियोजीत इशारा केला.

त्यानंतर मी व सापळा पथक तलाठी राणे यांचे कार्यालयाच्या आतमध्ये गेलो त्यावेळी मपोहवा गोरे यांनी तात्काळ शासकिय कॅमेरामध्ये चित्रीकरणास सुरुवात केली.त्यानंतर मपोशि माकर यांनी तक्रारदार राक्षे यांना लावण्यात आलेला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर काढून बंद केला ती वेळ 18.06 वा.ची होती. तलाठी राणे यांना ताब्यात घेऊन त्यानंतर तक्रारदार यांना लोकसेवक तलाठी राणे यांनी स्विकारलेली लाच रक्कम कुठे ठेवली आहे असे विचारले असता तक्रारदार यांनी सांगितले की,लोकसेवक तलाठी राणे यांनी त्यांचे टेबलच्या डाव्या बाजुचा ड्रॉवर उघडुन त्या मध्ये लाच रक्कम ठेवणेस सांगितलेने सदर लाच रक्कम तलाठी राणे यांच्या टेबलच्या डाव्या बाजुच्या ड्रॉवर मध्ये आहे. त्यावेळी लोकसेवक राणे यांना विचारणा करता त्यांनी सदरची लाच रक्कम त्यांचे टेबलच्या डाव्या ड्रॉवर मध्ये असल्याचे सांग सांगितले की,लोकसेवक तलाठी राणे यांनी त्यांचे टेबलच्या डाव्या बाजुचा ड्रॉवर उघडुन त्या मध्ये लाच रक्कम ठेवणेस सांगितलेने सदर लाच रक्कम तलाठी राणे यांच्या टेबलच्या डाव्या बाजुच्या ड्रॉवर मध्ये आहे. त्यावेळी लोकसेवक राणे यांना विचारणा करता त्यांनी सदरची लाच रक्कम त्यांचे टेबलच्या डाव्या ड्रॉवर मध्ये असल्याचे सांगितले.त्यानंतर पंचासमक्ष लोकसेवक राणे यांचे टेबल चे डाव्या बाजुच्या ड्रॉवरची तपासणी केली असता त्यामधे लाच रक्कम आढळुन आली. पंच क्र.02 श्री.जपे यांनी लाचेची रक्कम ताब्यात घेवून मोजली असता ती रुपये 25,000/- असल्याचे दिसून आले.त्यानंतर सदर नोटांचे सापळापुर्व कारवाई दरम्यान कागदावर लिहून ठेवलेल्या नोटांच्या नंबरशी खात्री केली असता तंतोतंत जुळून आले. त्यानंतर लोकसेवकास त्यांचे नाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव श्री.संतोष प्रल्हाद राणे वय-45 वर्षे व्यवसाय नोकरी पद-तलाठी सजा माणता.मुळशी जि. पुणे रा.फलॅट नं.बी/705 गंगा ओशीयन पार्क राजस सोसायटी जवळ कात्रज कोंढवा रोड पुणे असे सांगितले. त्यानंतर लोकसेवक तलाठी राणे यांचे कार्यालयातील लाईट बंद करुन ,खिडक्या लाऊन,कृत्रिम अंधार करुन, अल्ट्राव्हॉयलेट दिव्याच्या सहाय्याने प्रथम सापळा पथकातील अधिकारी/अंमलदार यांचे हात व कपडयांची तपासणी केली असता कोठेही अॅन्थ्रॉसीन पावडरची फिक्कट निळसर रंगाची चकाकी दिसून आली नाही. त्यानंतर पंच क्र.2 श्री.जपे यांचे हातास अॅन्थ्रॉसीन पावडरची फिक्कट निळसर रंगाची चकाकी दिसून आली कारण त्यांनी सापळा यशस्वी झालेनंतर लाच रक्कम लोकसेवक यांचे टेबलच्या ड्रॉवर मधुन ताब्यात घेतली होती.ताब्यात घेतलेली लाच रक्कम अल्ट्राव्हायलेट दिव्याच्या प्रकाशात पाहिली असता त्यावर देखील फिक्कट निळसर रंगाची चकाकी दिसून आली.ड्रॉवर मध्ये पण फिक्कट निळसर रंगाची चकाकी दिसून आली.

त्यानंतर तक्रारदार श्री.राक्षे व पंच क्र.01 यांना सापळा कारवाई दरम्यान घडलेल्या घटनेबाबत विचारणा केली असता तक्रारदार यांनी सांगितले की, मी पंच क्र.1 सुदामे यांचेसह तलाठी कार्यालय सजा माण ता.मुळशी जि. पुणे येथे जाऊन तलाठी राणे यांची भेट घेतली असता त्यावेळेस मी त्यांना "झाल साहेब आपल काम....... फेरफारच?" असे विचारले असता राणे यांनी "हांच काय किती दिवस मुदत ये," असे इतर व्यक्तीस विचारुन त्यानंतर "चार पाच दिवस टाईम ये, देवुन टाका.. देतो" असे बोलले.त्यावर मी "चालतय" असे बोलेलो असता राणे यांनी "बोला" असे म्हणुन हाताने इशारा करुन पैशाची मागणी केली.त्यावर "तुम्ही सांगितले तेवढे आणलेत" असे मी बोललो असता त्यावर त्यांनी" हे कोण येत साहेब?" असे पंचांना उद्देशुन विचारले.त्यावर मी "ते आपल ना.त्या दिवशी होता ते कार्यकर्ता" असे म्हणुन पंचांची ओळख करुन दिली त्यानंतर राणे यांनी ते बसलेल्या टेबलचा डाव्या साईडचा ड्रॉव्हर उघडुन त्यामध्ये इशा-याने पैसे ठेवण्यास सांगितले.त्यावर मी त्यांना "ठेऊन देतो ठिकय, "ओके कावा होईल ते काम आपल" असे विचारले असता तलाठी राणे यांनी "किती येत? असे विचारले त्यावर मी "आहे ओ..तुम्ही आता. आयो नका टेन्शन घेवु जेवढे ठरले तेवढेय" असे म्हणुन "व्टेंन्टी फाय" असे बोललो त्यावर



Scanned with CamScanner

यांनी "काट मारली तुम्ही" असे म्हणुन मला पैसे ड्रॉवर मध्ये ठेवण्यास सांगितले असता मी माझे जवळील माझ्या नेसत्या पँट च्या पुढील बाजुच्या उजव्या खिशातील लाच रक्कम उजव्या हाताने काढुन तलाठी राणे यांनी उघडलेल्या टेबलच्या डाव्या बाजुच्या ड्रॉवर मध्ये ठेवली व मी त्यांना "पंचवीस हजार रुपयेत जाऊ द्या आता एवढी सुट द्या आम्हाला ह.. नाराज नाही ना? असे विचारले असता ते नाही असे म्हणाले त्यानंतर मी कार्यालयाचे बाहेर येऊन लाच स्विकारल्याचा पुर्व नियोजित इशारा केला.अशा आशयाची हकिकत तक्रारदार यांनी पंचासमक्ष सांगितली सदर बाबत सविस्तर पंचनामा करणेत आला आहे.

तरी तक्रारदार श्री.अतुल दत्तात्रय राक्षे यांनी दि.11/05/2026 रोजी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दि. 14/05/2026 रोजी करण्यात आलेल्या पडताळणी वेळी तक्रारदार व त्यांचे भाऊ यांचे वडीलोपार्जीत शेत जमीनीचा 7/12 उतारा व फेरफार वर नाव धरणेसाठी तक्रारदार यांचेकडे तलाठी राणे यांनी यापुर्वी दिड लाख रुपये ची मागणी करुन तडजोडीअंती 1 लाख पंचवीस हजार रुपये ची मागणी करुन यापुर्वीच 1 लाख रुपये स्विकारल्याचे मान्य करुन फेरफार नोंद धरल्याचे सांगुन केलेल्या कामाचा मोबदला म्हणुन उर्वरीत 25,000/- रुपयेची मागणी केली व दि.19/05/2026 रोजी सापळा कारवाई वेळी तलाठी कार्यालय सजा माण ता.मुळशी जि.पुणे येथे तलाठी राणे यांनी तक्रारदार राक्षे यांचेकडुन पंचासमक्ष लाच रक्कम पंचवीस हजार रुपये स्विकारले असता 18.06 वा चे सुमारास तलाठी राणे यांना रंगेहात पकडणेत आले आहे म्हणुन श्री.संतोष प्रल्हाद राणे वय-45 वर्षे व्यवसाय नोकरी पद-तलाठी सजा माण ता.मुळशी जि.पुणे रा.फलॅट नं.बी/705, गंगा ओशीयन पार्क, राजस सोसायटी जवळ कात्रज कोंढवा रोड, पुणे यांचे विरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम कलम 7 प्रमाणे कायदेशीर फिर्याद आहे.
माझा वरील फिर्यादी जबाब माझे सांगणे प्रमाणे टंकलिखीत करण्यात आला असून तो मी वाचून पाहीला असून बरोबर आहे.

हा फिर्यादी जबाब दिला....

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
Vikas Gyaneshwar Taktode
**Rank** (पद): SI (Sub-Inspector) **No.**(क्र.): PSI
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):



Scanned with CamScanner

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**Registered by** (नोंदणी अधिकारी)
**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

पोलीस ठाणे अमलदार
हिंजवडी पोलीस स्टेशन
पिंपरी चिंचवड शहर

**Name** (नाव): Balaji Angadrao Pan
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): PI

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

PI ACB

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):



Scanned with CamScanner